OFFICE OF THE SUPDT. OF POLICE JALGAON
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव
Office Ph -0257-2220411 Fax - 0257-2220511
Email ID - sp.jalgaon@mahapolice.gov.in

प्रेस नोट :- दिनांक :- १०/०१/२०२६

प्रति,

मा.संपादक ,

---

विषय :- स्थानिक गुन्हे शाखा जळगाव कडुन घरफोडी करणारा आंतरराज्यीय अट्टल गुन्हेगार जेरबंद....

--- ००० ---

गेल्या महिन्या भरापासून जळगाव शहरात घरफोडी चोरीचे गुन्ह्यात वाढ होत असल्याने मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी पोलीस अधीक्षक जळगाव मा.श्री अशोक नखाते अपर पोलीस अधीक्षक जळगाव यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना तपासा बाबत आदेश दिले. त्यावरून मा. राहुल गायकवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांनी त्यांचे ०२ स्वतंत्र पथक तयार करुन गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

स्थानिक गुन्हे शाखा जळगाव कडील पथक यांनी सतत नमुद गुन्हयाच्या अनुशंगाने प्राप्त सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रीक विश्लेषण करुन, आरोपी **नामे चंदन राजु जुनी वय ४५ वर्ष रा.सरदारपाडा वस्ती, उल्हासनगर - १ ता.कल्याण जि.ठाणे** यास निष्पन्न करुन, त्यास कोठारी व्हील चे शेजारी रामटेकडी, हडपसर पुणे येथुन ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता त्याने जळगाव शहरातील शनीपेठ पोलीस स्टेशन कडील सीसीटीएनएस क्रंमाक १) २५१/२०२५ बीएनएस २०२३ चे कलम ३३१(४),३०५, प्रमाणे २) २५२/२०२५बीएनएस २०२३ चे कलम ३३१(४),३०५, प्रमाणे दाखल अशा ०२ गुन्हयांची कबुली दिली असुन, सदरचे गुन्हे हे त्याचे साथीदार त्याचा भाऊ नामे कुलदीप राजु जुनी व त्यांचे इतर ०२ साथीदार यांच्या साथीने केल्याची कबुली दिली आहे.तसेच सदर गुन्हयातील चोरी केलेले मुद्देमालाबाबत विचारपुस केली असता, त्याचे म्हणणे की, त्याचा गुन्हयातील साथीदार त्याचा भाऊ नामे कुलदीप राजु जुनी याने सदरच्या मुद्देमालीची विल्हेवाट लावुन, त्याचे हिस्याचे ३८,०००/- रुपये ऑनलाईन त्याच्या बँक खात्यावर टाकले असल्याचे कबुली दिली आहे.

नमुद आरोपी **नामे चंदन राजु जुनी वय ४५ वर्ष रा.सरदारपाडा वस्ती, उल्हासनगर - १ ता.कल्याण जि.ठाणे** यास पुढील कारवाई कामी शनीपेठ पोलीस स्टेशन जि जळगाव यांच्या ताब्यात दिले असुन, इतर आरोपीतांचा पोलीस शोध घेत असुन, पुढील तपास शनीपेठ पोलीस स्टेशन कडील पोलीस उपनिरीक्षक योगेश ढिकले हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी पोलीस अधीक्षक जळगाव मा.श्री अशोक नखाते अपर पोलीस अधीक्षक जळगाव, मा.श्री नितीन गणापुरे उपविभागीय पोलीस अधिकारी जळगाव भाग श्री राहुल गायकवाड वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री शरद बागल, सोपान गोरे सपोउपनिरी अतुल वंजारी,पोहवा विजय पाटील,अक्रम शेख, नितीन बावीस्कर, मुरलीधर धनगर, प्रविण भालेराव, नापोशि किशोर पाटील,पोशि राहुल रगडे, रविंद्र कापडणे, डापकर चापोशि महेश सोमवंशी, सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, तसेच तांत्रीक मदत पोशि/ईश्वर पाटील, गौरव पाटील, मिंलीद जाधव, तसेच नेत्रम विभागाचे पंकज खडसे,मुबारक देशमुख, कुंदनसिंग बयास यांच्या पथकाने केली आहे.

जनसंपर्क अधिकारी
जळगाव जिल्हा पोलीस


स्थानिक गुन्हे शाखा
११ रेकार्ड रुम
रेकॉर्ड रुम
श्री.राहुल गायकवाड